कासोदा पोलीस स्टेशन ता.एरंडोल जि.जळगांव
ई-मेल आय.डी.kasoda.ps@gmail.com
दुरध्वनी क्रमांक-02588-230333

**प्रेस नोट**

दिनांक -०८/०४/२०२५

प्रति,
सर्व संपादक सो
वृत्तपत्र व इलेक्ट्रॉनिक मिडीया,
जळगाव जिल्हा

**विषय-** कासोदा पोलीस स्टेशन कडुन जलद गतीने २४ तासात मा.न्यायालयात दोषारोप पत्र सादर केले बाबत.

कायदा व सुव्यवस्था राखण्या बरोबरच समाजात सुरक्षा आणि न्यायाचे भान निर्माण करणे हे देखील पोलीस दलाचे कर्तव्य आहे. त्या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाने सुरु केलेल्या १०० कलमी कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर पोलीस दलाकडुन वेगवान व कार्यक्षम तपासास अधिक प्राधान्य दिले जात आहे. मा.पोलीस अधिक्षक श्री महेश्वर रेड्डी यांचे आदेशानुसार महिला अत्याचाराच्या बाबतीत जलद तपास करुन लवकरात लवकर मा.न्यायालयात दोषारोपपत्र सदर करण्यावर भर दिला जात आहे. त्या अनुषंगाने कासोदा पोलीस स्टेशन येथे दि.०३/०४/२०२५ रोजी CCTNS.NO-४३/२०२५ BNS-७४,३३३,११५(२)३५२,३५१ प्रमाणे दाखल विनयभंगाच्या गुन्ह्याचे चार्जशिट दि.०४/०४/२०२५ रोजी २४ तासाचे आत मा.न्यायालयात दाखल केले आहे.

तसेच दि.०१/०४/२०२५५ रोजी दाखल असलेल्या CCTNS.NO-४३/२०२५ BNS-७४, (विनयभंग) सह पोस्को कायद्याचे कलम ८ व १२ प्रमाणे दाखल गुन्ह्यामध्ये आरोपीचा दोन दिवस अविरतपणे शोध घेवुन त्यास अटक केले व सदर गुन्ह्याचे दोषारोप पत्र दि.०४/०४/२०२५ रोजी मा.न्यायालयात ०४ दिवसात दाखल केले आहे.

मा.पोलीस अधिक्षक श्री. महेश्वर रेड्डी सर यांचे आदेशान्वये अपर पोलीस अधिक्षक मा.कविता नेरकर-पवार, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री, राजेशसिंह चंदेल, यांचे मार्गदर्शनाखाली कासोदा पोलीस स्टेशन प्रभारी सहा.पोलीस निरीक्षक-निलेश राजपुत, तपासाधीकारी-पो.उपनिरी. दत्तु खुळे, तपासाधीकारी- पोहका/६९८ राकेश खोंडे यांच्या टीमने जलदगतीने चार्जशिट पाठविण्याची मोहीम यशस्वी केली.

जळगाव जिल्ह्यात २४ तासात मा.न्यायालयात चार्जशिट दाखल करणारे कासोदा पोलीस स्टेशन हे जिल्ह्यात अव्वल क्रमांकाचे टरले आहे.

सविनय सादर

(निलेश दिवाणसिंह राजपूत)
सहाय्यक पोलीस निरीक्षक
कासोदा पो.स्टे